Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.12,Jan. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# धर्म आणि साहित्यः एक संबंधावलोकन

*सिदार्थ आगळे*

***सारांश***

हजारो वर्षांपासून मानवी जीवनाला अव्याहतपणे प्रभावित करत आलेल्या सत्ता म्हणून धर्म व साहित्य या दोन सत्तांचा उल्लेख करावा लागतो. मुळारंभी त्या विभक्त नसून एकरूपच होत्या. भरतांनी नाट्यकलेचा उल्लेख 'पंचमवेद' म्हणूनच केलेला आहे. प्राचीन काळी साहित्य किंवा साहित्यशास्त्र हा धर्माप्रमाणे विधीचाच एक भाग होता. 'क्रियाकल्प' हे साहित्यशास्त्राचे प्राचीन नामाभिधान हेच दर्शविते. यशोधराने या संज्ञेचा अर्थ 'क्रियाकल्प इति काव्यकरणविधी' असा दिलेला आहे. क्रियाकल्प म्हणजे काव्याची रचना करण्याचा विधी. या दोन्ही संतांची एकरूपता स्पष्ट करताना प्रा. वसंत आबाजी डहाके यांनी यथार्थपणे म्हटले आहे की, ''शेवटी धर्म काय आणि कला काय एकाच गोष्टीतून उगम पावलेल्या आहेत. आपल्या भोवतीच्या निसर्गाविषयाचे भय आणि आपल्या भोवतीच्या माणसांविषयीचे भय. 'स्ट्रेंज' जगात वावरत असताना मनुष्य ज्या भयाने ग्रस्त होता त्यातून धर्म उत्पन्न झाला. दुसरीकडे त्यातूनच कला उत्पन्न झाली. अशाप्रकारे जेव्हा आपण धर्माचा विचार करतो त्याच पद्धतीने कलेचाही विचार करावा लागतो. मराठीतसुद्धा धर्म आणि कला एकच आहेत. कित्येक वर्षेपर्यंत धर्म आणि कला या दोन गोश्टी नव्हत्याच. एकत्र चालत आलेल्या होत्या. ह्याचा अर्थ धर्माची मी सांगतो आहे ती संकल्पना वेगळी आहे. आज जी धर्मकल्पना सांगितली जाते, प्रचलित आहे, ती ही नव्हे... धर्म म्हणून जी मूळ कल्पना आहे, त्याविशयी मी बोलतो आहे. त्या धर्म आणि कला यांचा अशाप्रकारचा उगम–दुःख भोगणारा माणूस, दुःखाशी सामना करणारा माणूस, दुःखामुळे धर्माकडे वळणारा माणूस हा साहित्याचा विषय असतो.''[1]

## *प्रस्तावना*

धर्म आणि साहित्य यांच्या एकरूपतेचे 'महाभारत' हे एक उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. महाकाव्याप्रमाणेच धर्मग्रंथ म्हणूनही त्याच्याकडे पाहिले जाते. त्यातून धर्माचीच महती व्यासांनी गायिली आहे. ''मी भूजा उभारून आक्रोश करतो आहे. पण माझे कोणी ऐकत नाही. (हे मानवांनो) धर्मामुळे अर्थ व काम हे दोन्ही साध्य होतात. असे असताना तुम्ही धर्माची कास का धरीत नाही?'' असा प्रश्न व्यासांनी महाभारतात उपस्थित केलेला आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन काव्य प्राधान्याने धर्मकेंद्रीच राहिलेले दिसते. 'अवदान कल्पलते'त क्षेमेन्द्राने धर्ममाहात्म्यपर अशी जी संस्कृत रचना केलेली आहे त्याचे धर्मानंद कोसंबीकृत भाषांतर पुढीलप्रमाणे आहे.

''धर्म हा अंधकारात प्रकाश आहे. विपत्तिरूपी विषाचा नाश करणारा मणी आहे. पडलेल्याला हात देणारा आहे. इच्छेचे फल देणारा हा कल्पतरू आहे. जगताचा जय करणारा हा जणू रथ आहे. परलोक शिदोरी, दुःखरूपी व्याधींचे महौशध, भवभयाने भ्रांत झालेल्या अंतःकरणाला आश्वासन, दाह झाला असता चंदनवन, हा कायमचा मित्र आहे, आणि हा सज्जनांचा खरा बांधव आहे.''[2]

विद्यमान काळात धर्म आणि साहित्य या दोन सत्ता एकमेकांसमोर उभ्या ठाकलेल्या दिसत असल्या तरी आजही काहींना धर्माशिवाय जीवन (ज्यात कला व साहित्यही आले.) ही कल्पना अशक्य वाटताना दिसते.

चार पुरूषाथांपैकी धर्म आणि मोक्ष हे पुरूषार्थ नाकारणाऱ्या चार्वाकमताविशयीचे प्रा. हिरियण्णांचे भाग्य यादृष्टीने लक्षणीय आहे. ते म्हणतात, ''एकवेळ मोक्षाचे ध्येय न मानणाऱ्या संप्रदायाची कल्पना करता येईल. परंतु धर्म न मानणाऱ्या संप्रदायाची कल्पनाही करवत नाही. मृत्यू हा जीवनाचा अंत असून त्यानंतर काही उरत नाही हे कदाचित खरे असेल; परंतु धर्म वगळून दुसरे काही जीवनाचे ध्येय मानणे म्हणजे मानवाला पशुत्वाच्या पातळीवर नेणे होय. अशाप्रकारचा विचारसंप्रदाय अस्तित्वात होता यावर विश्वास बसणे कठीण आहे.''[3]

भारतीय संस्कृती कोशातील नोंदही असेच सुचवताना दिसते. ''खरी गोष्ट अशी आहे की जीवनापासून धर्म अलग केला गेला तर, जीवनातील रसच आटून जाईल. धर्म हे मानवतेचे श्रेष्ठ आलंबन आहे, ते मानवतेचे रक्षण आहे. मानवता टिकायला हवी असेल, तर तिच्या हृदयातील धर्मरूपी प्राण जागता ठेवायलाच हवा.''[4]

धर्माला जीवनाचे केंद्र मानले की साहित्याच्या मूल्यमापनाचे निकश धर्मसंबंधित असणे ही बाब ओघाने येतेच. श्रेष्ठ काव्याची कसोटी सांगताना ज्ञानेश्वरांनी 'रसिकत्वी' परतत्व स्पर्शू जैसा' असाच उल्लेख केलेला आहे. प्रा. केशव विश्णू बेलसेर यांनी आनंद प्राप्तीच्या आत्मविस्मृतीच्या तीन मुख्य मार्गांचे विवेचन करताना ज्ञानेश्वरांप्रमाणेच प्रतवारी लावलेली दिसते. ते म्हणतात, ''ज्याचा 'मी' विसरण्याचा मार्ग हलका, त्याचे यश हलके असते. ज्याचा 'मी' विसरण्याचा मार्ग भारी, त्याचे यशही भारी असते. एक तर, खाण्यापिण्याला सर्वस्व मानून जगणारा व व्यसनामुळे शरीराची शुद्धी नसलेला माणूस हीन मार्गांनी स्वतःला विसरतो. त्याचा आनंद तात्पुरता व परावलंबी असतो, दूसरा मार्ग अधिक चांगला आहे. लेखन–वाचनात तंद्री लागलेला किंवा संगीत, चित्र, नृत्यनाट्य यांची धुंदी चढलेला माणूस वरच्या दर्जाचा असतो; पण चिंतनाची तंद्री उतरली किंवा कलेची मस्ती जिरली की, माणूस आनंदापासून खाली घसरतो. आनंद भोगल्याची नुसती गोड आठवण शिल्लक उरते; पण तिसरा मार्ग श्रेश्ठ आहे. सदाचरण करणारा, विकार स्वाधीन ठेवणारा, कर्तव्य मनापासून करणारा, सर्वांवर निरपेक्ष भावनेने प्रेम करणारा आणि

**Title :** *धर्म आणि साहित्यः एक संबंधावलोकन*
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850]** *सिदार्थ आगळे* **yr:2013 vol:2 iss:12**

भगवंतांच्या उपासनेत रंगलेला माणूस उत्तम उर्जाचा असतो. त्याचा 'मी' आनंदमय बनून जातो. परमानंदाची व त्याची कधीच ताटातूट होत नाही. ''[5]

टॉयस्टायने यासंदर्भात म्हटले आहे की, ''चांगली कला आस्वादकाला भावनेचा संसर्ग करते आणि सर्वात चांगली कला धार्मिक भावनेचा संसर्ग करते.'' त्याच्या मते, कला म्हणजे एक 'गोंडस असत्य' आहे. ''मी सत्याखेरीज इतर कोणतेही मूल्य मानत नाही... आजवर तरी सत्य आणि ख्रिश्चिॲनिटीचे माझ्या मताप्रमाणे असणारे स्वरूप यात मी अभेद मानत आलो आहे. मी ख्रिश्चिॲनिटीला अगदी घट्ट धरून आहे'' असे टॉयस्टाय म्हणतो.''[6]

दस्तेयवस्कीचे मूल्यमापन करताना अनिरूद्ध कुलकर्णी यांनी म्हटले आहे की, ''ख्रिश्चन तत्त्वज्ञान हा दस्तेयवस्कीच्या एकंदर विचारमंथलातील एक स्थिर घटक राहतो. चर्चची इमारत कधीही दृश्टीआड होत नाही.''[7]

साहित्यविचारात नैतिक व धार्मिक पैलूकडे दुर्लक्ष करता येत नाही हा विचार मांडतांना टी. एस. एलियटने, ''Literary criticism should be completed by criticism from a definite ethical and theological point.'' असे विधान केलेले आहे.[8]

मराठीतील मार्क्सवादी साहित्यिक, समीक्षक प्रा. शरश्चंद्र मुक्तिबोध यांच्या साहित्याचे मूल्यमापन करताना डॉ. रा. भा. पाटणकरांनी म्हटले आहे, ''मानवाच्या परम कल्याणाविषयी दोन विचारसरणी जगभर प्रचलित असल्याचे दिसते. एक म्हणजे माणसाने जास्तीत जास्त सुखे मिळवावीत, जास्तीत जास्त इच्छांची तृप्ती साधावी. (रिचर्ड्स, ड्युई, उपयुक्ततावादी, मार्क्स); पण भारतात व युरोपात शतकानुशतके चालू असलेली श्रमणपरंपरा पाहिली की 'इच्छातृप्ती' इतकी 'इच्छादमना'ची प्रेरणाही मानवामध्ये प्रबळ असल्याचे दिसते.''[9] दुसऱ्या एके ठिकाणी डॉ. पाटणकर म्हणतात, ''सामाजिकतेबरोबर अतिभौतिकीय (किंवा एका व्यापक अर्थाने धार्मिक) परिमाणही जीवनातील व वाङ्मयातील मोठेपणाला आवश्यक आहे.''[10] या अतिभौतिकीय प्रश्नांच्या काही प्रमाणातील उपस्थितीमुळेच व्यास, ज्ञानेश्वर, शेक्सपिअर, डोस्टोव्हस्की यांच्या वाङ्मयाला श्रेष्ठत्त्व प्राप्त झाले असल्याचे डॉ. पाटणकर सांगताना दिसतात.

साहित्यिक समीक्षकांच्या दुसऱ्या एका गटाचा दृष्टिकोण मात्र धर्मकेंद्री नसून आपल्या विवेचनातून हा गट धर्मविषयक दृष्टीला नकार देताना दिसतो. निवृत्तिपरतेचा सोम्य शब्दांतील निशेध सातव्या शतकातील 'नागानंद' या संस्कृत नाटकात अभिव्यक्त झालेला दिसतो. या नाटकातील नायक स्वतःला शांती प्राप्त व्हावी यासाठी जगापासून निवृत्त होणाऱ्या साधूचा निशेध करताना म्हणतो, ''वनात राहणारा पतस्वी सुखी असतो यात संशय नाही. हिरवळ हा त्याचा बिछाना असतो. शुभ्र खडक हे त्याचे आसन असते. छाया देणारा वृक्ष हे त्याचे निवासस्थान असते. झऱ्याचे थंड पाणी हे पेय आणि कंदमुळे हे अन्न असते. हरीण हे त्याचे सोबती असतात. तथापि अशा आयुश्यात एक वैगुण्य असते. अत्यंत एकांतवासात सहजीवी मानवांना सहाय्य करण्याची संधी नसल्याने ते जीवन व्यर्थ आहे.''[11] या नाटकाच्या बरोबर भवभूताच्या 'मालती–माधव' चाही निर्देश प्रा. हिरीयण्णांनी केलेला आहे.

आधुनिक काळात याही पुढे जाऊन काव्य धर्माची जागा घेईलए अशा स्वरूपाचा आशावाद आय. ए. रिचर्ड्स प्रभृतींनी व्यक्त केलेला दिसतो. आर. जी. कॉलिंगवूडसारख्या समीक्षकांच्या विवेचनात कवी–कलावंत प्रेशिताची, धर्मदूताची भूमिका बजावताना दिसतो. ''His business as an artist is to speak out, to make a clean breast. But what hi has to utter is not, as the individualist theory of art would have us think, his own secrets. As spokesman of his community, the secrets he must utter are theirs. The reason why we need him is that no community altogether knows its own heart and by failing in this knowledge a community deceives itself on the one subject concerning which ignorance means death. For the evils which comes from that igmorance the poet as prophet suggests no remedy, because he has already given one. The remedy is the poem itself. Art is the community's medicine, the worst disease of mind, the corruption of consciousness.'' कॉलिंगवूडच्या या विवेचनाचे त्र्यं. वि. सरदेशमुखांनी केलेले भाषांतर पुढीलप्रमाणे आहे. 'हृदय मोकलून ठेवणे हे कलावंताचे कार्य आहे. म्हणजे आपली खाजगी रहस्ये त्याने उघडी करायची असे नसते. समाजमनाला मुखर करण्याची त्याची भूमिका असल्याने, तो बोलेल ती रहस्ये जनसामान्यांची असतील. या सामान्यांना आपल्या अंतःकरणात काय चालू आहे आणि नाही याची दखल नसते. म्हणून तर कलावंताची त्यांना गरज असते. आपले अंतःकरण स्वतःसच असे अनोखे झाल्याने तो जनसमाज आत्मवंचक बनतो. अशी वंचना म्हणजे एक प्रकारचा मृत्यूच. कवीची कविता हीच वंचनेपासून वा मृत्यूपासून मुक्ती. कवीजवळ तर तिच्यावाचून दुसरे कोणते औशध असते?जाणिवेचे भ्रष्टीभवन ही समाजाची एक दुर्धर व्याधी. कला हा तिच्यावरचा उतारा.''[12]

धर्मविरोधी भूमिका घेणाऱ्या साहित्यिकांत तस्लिमा नसरीन यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. धर्म हा स्त्रियांच्या व एकूणच मानवी हक्कांविरुद्ध असल्याने आपली भूमिका धर्म नाकारण्याची आहे असे तस्लिमा म्हणताना दिसतात. ''Why are you so anti-religious?'' या रश्मी सेहगल यांच्या प्रश्नावर त्यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

''I am not believer in God. I am atheist. I have always mentioned that religion is against human rights and against women's righys. That does not make me an intolerant person. I want to express myself and I believe I have a right to express according to my beliefs.''

''I have always mentioned that the real fight is not between the west and Islam or even between Christianity and Islam but between secularism and fundamentalism and between a rational world view and blind faith. I have always valued freedom but that is not the case with those who are strapped to blind faith.''[13]

मराठी साहित्याच्या दृष्टीने विचार केला तर धर्माला नकार देऊन त्याच्या जागी साहित्याची प्रस्थापना करणारी भूमिका प्रा. रा.ग. जाधव यांनी मोठ्या हिरिरीने मांडलेली आहे. ते म्हणतात, ''कोणताही धर्म व कोणतेही दार्शनिक तत्त्वज्ञान माणसाला माणूस म्हणून संपूर्ण प्रतिष्ठा देते की नाही याबद्दल मला शंका आहे. मनुष्य व मनुष्य जीवन यांना स्वत्व किंवा अस्मिता असते किंवा बहाल करणे उचित ठरते हे, निदान सरळपणे मान्य करण्यास धर्म व तत्त्वज्ञान क्वचितच राजी असतात. माणसाची आयडेंटिटी, त्याचे स्वत्व म्हणजे पार्थिवता आहे हे त्यांना मान्य नसते. मनुष्याची सुखदुःखे, त्याचे यशापयश, त्याची असहाय्यता व अगतिकता, त्याची पराधिनता व पतनप्रवणता, त्याचे कल्याण व सार्थकता या सगळ्यांविषयी धर्म व दर्शने विलक्षण संवेदनशील असतात, कारुण्याने गदगदलेली असतात; उद्धारासाठी व तारणासाठी उत्सुक असतात हे खरेच आहे. पण यासाठी ते माणसाच्या वास्तव जिण्याचाच संकोच करतात, त्याला त्याच्या मनाच्या व जगाच्या छोट्या खंडावर उभे राहण्यास सांगतात. व्यापक व विविधतापूर्ण मनुष्यसृष्टीचा एखाद्या मठात, एखाद्या मंदिरात, एखाद्या मशिदीत, एखाद्या चर्चमध्ये किंवा एखाद्या स्तूपविहारात संक्षेप घडवून आणतात. मनुष्याच्या या भव्योदात्त सृष्टीला नजरेआड करून नजरेआडच संभवणाऱ्या अलौकिक सृष्टीचा एक मोहक पर्याय निर्माण करतात. मनुष्याची स्वायत्तता, अस्मिता, स्वयंपूर्णता, स्वाभिमान यांना धर्मदर्शनांनी दिलासा दिलाही असेल; पण त्यावरील विश्वासाची कबुली मात्र दिलेली नाही. साहित्य या प्रकाराची कबुली कळत–नकळत मनुष्यमात्राला देत असते. माणसाला उठवण्याचा यत्न केलेला नाही. माणसाची प्रतिष्ठा या जगात साहित्यानेच प्रारंभापासून सांभाळली आहे. मानवी समाजाच्या इतिहासात माणसे जोडण्याची, माणूसपणाचा विस्तार करण्याची,

स्थलकालनिरपेक्ष अशी लांबलचक मनुष्यशृंखला जुळवण्याची कामगिरी साहित्याने केलेली आहे. मनुष्य समाजातील साहित्याचा इतिहास हाच माणसाचा खराखुरा इतिहास आहे, कारण तो माणसाचे माणूसपण विकसित करणारा एकमेव घटक आहे. माणसाची आरती फक्त साहित्यानेच गायिली आहे, धर्मांनी व दर्शनांनी नव्हे! मानव्याची विशाल वैश्विक प्रचिती केवळ साहित्यानेच दिलेली आहे. माणसाची खरी स्वप्ने फक्त साहित्यानेच पाहिली आहेत. साहित्य हेच मनुष्यत्वाचे आद्यंती शुद्ध असलेले एकमेव प्रतीक आहे, प्रतिमा आहे.

''एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसावरच सूक्त रचावे
माणसाचे गाणे गावे माणसाने...''

असे उदात्त भान एक कवीच व्यक्त करीत असतो. धर्म–दर्शनेही एक तीळ सर्वांनी करंडून खावा असे सांगतात, सांगू शकतात; पण त्यामागील भावना माणसावरील श्रद्धेची नसते; तर ती माणसावरील विकल्पाची असते. धर्म–दर्शनांनी माणसाची आरती कधी मनापासून म्हटलेली नाही. त्यांनी माणसावरील विश्वास कधीही व्यक्त केला नाही...

साहित्य धर्माला कोणी एकमेव प्रेषित नाही, परमेश्वर नाही. एकच एक धर्मग्रंथही नाही. चार ओळींची कविता हीदेखील आपला धर्मग्रंथ होऊ शकते, आणि एखाद्या अज्ञात, अंधाऱ्या गावकुसाबाहेरचा एखादा लेखक हाही आपला धर्मपुरुष असू शकतो. साहित्य–धर्म हा एकमेव मुक्त मानवधर्म आहे. या जगात जर कधीकाळी एकता व एकोपा निर्माण झालाच, तर तो फक्त साहित्य–धर्माच्या अधिष्ठानावरच होऊ शकेल! साहित्याची भाषा ही त्याची खरी भाषा नाही. साहित्याची खरी भाषा भावना हीच आहे. ही भावना नैतिकतेची, मूल्यभानाची आहे. धर्मदर्शनांचीच भाषाही हीच असते, हे खरे; पण या भाषेने माणसांची उभी किंवा आत्मकेंद्रित वाढ होते. उलट साहित्याच्या भाषेमुळे माणसाची आडवीही वा बहुकेंद्री वाढ होते. आणि विद्यमानाच्या ज्या पर्यावणात आपण सर्वजण वावरत आहोत, ज्या पर्यावरणात आपण आपला साहित्यधर्म सांभाळत आहोत, त्या आज–उद्याच्या पर्यावरणात उभ्या विकासापेक्षा आडव्या विकासाची गरज अधिक आहे.''[14]

महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या फुले–आंबेडकर व्याख्यानमालेत याच विषयावर विवेचन करताना प्रा. रा. ग. जाधवांनी म्हटले आहे की, ''साहित्य ही माणसाला माणुसकी शिकवणारी संकल्पना आहे, तर धर्म ही माणुसकीपासून दूर नेणारी. त्यामुळे धर्माचा मानवी जीवनावरील दबाव नष्ट करण्यासाठी डोळस साहित्याच्या निर्मितीची गरज आहे. धर्माने माणसाला गटागटात विभाजित केले असल्याने माणुसकीची संकल्पना नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. अशा परिस्थितीत केवळ साहित्य या संकल्पनेने सुख, दुःख, यश, अपयश हे मानवी जीवनाचे विविध पैलू उलगडण्याचे काम केले आहे. धर्म ही संकल्पना विशिष्ट आचरणाचा दबाव माणसावर लादते. हा दबाव नष्ट करण्यासाठी डोळस साहित्याच्या निर्मितीची गरज आहे.''[15]

धर्माच्या संदर्भात अशीच प्रतिकूल भूमिका भालचंद्र नेमाडे यांनीही मांडलेली दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर व दलित साहित्य याबाबत भाश्य करताना त्यांनी म्हटले आहे, ''नवबौद्ध लेखकांना धर्म ही एक अडगळ होण्याची मात्र शक्यता आहे. एकोणिसाव्या शतकात भूतकाळ उकरून हिंदू झाले त्यातलाच हा प्रकार असल्याने ही लाट संपून जाईल व माणसाला समाधान मिळण्यासाठी अशा कोणत्याही एका आधाराची गरज नाही, हे जागृत दलित समाजाला आपोआप कळून येईल... खरे तर वैयक्तिक स्वातंत्र्याशिवाय कोणत्याच दडपणातून सुटता येत नाही व हे स्वातंत्र्यच आपल्या दलित वर्गीयांनी मिळवले तरी पुरे आहे. धार्मिक स्वातंत्र्यासकट इतर सर्व 'स्वातंत्र्ये' अवडंबरेच होत. सामाजिक अर्थाने साहित्य म्हणजे व्यक्तिपरत्वे अनुभव घेण्याचे व ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे.''[16]

नव्या सहस्त्रकातील मराठी साहित्यातील उगवत्या पिढीच्या धर्मविषयक जाणिवांचा कानोसा घेतला तर असे दिसते की धर्मसंस्थेचे स्वरूप शोषणमूलक झाल्यामुळे तिच्याविषयी कोणतेही ममत्व या पिढीला वाटेनासे झाले आहे. या दृष्टीने प्रातिनिधिक ठरतील अशा दोन साहित्यिकांची नोंद घेऊन हे विवेचन संपवुया.

1) कमलेश वालावलकरांच्या 'बाकी शून्य' या कादंबरीतील नायकाची वेताळाशी झालेली प्रश्नोत्तरे अशी :

''सर्वाधिक विकृत कोण?''
''परमेश्वर?''
''सर्वाधिक आवश्यक गोष्ट?''
''श्वास?''
''सर्वाधिक अनावश्यक गोष्ट?''
''धर्म.''[17]

2) सचिन माळी हा नवोदित कवी 'धरमाच्या तंद्रीत?' या कवितेत म्हणतो,

पहा

''कुणाला आलंय फेफरं
कुणाला चढलीय नशा आणि
कुणी हरवलीय डबक्यातील दुनिया
धरमाच्या तंद्रीत
पाहु
कुणी उबवला गर्भ ब्रह्माच्या मुखात
कुणी वितळवली मेणबत्ती येशूच्या टाळूवर
कुणी डोळ्यात सुरमा भरून गंडवलं महंमदाला
कुणाचा धर्म खतऱ्यात कुणी पुकारला जिहाद
बघा
साऱ्यांचचं बिंग फुटलं
आता कुणाला शिकवत्यात
बघू?''[18]

### संदर्भ :

1) संमेलनाध्यक्ष रा. ग. जाधव – संपादन : अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004, पृ. 182′183.
2) बुद्ध, धर्म आणि संघ : धर्मानंद कोसंबी, रघुवंशी प्रकाशन, मुंबई, पृ. 22.
3) भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेशा : अनु. प्रा. भा. ग. केतकर, पुणे विद्यापीठ, 1973, पृ. 195
4) भारतीय संस्कृती कोश – पं. महादेवशास्त्री जोशी, 1988, पृ. 584.
5) भक्तिमंदिरातील नंदादीप – डॉ. हे. वि. इनामदार, ब्ल्यू बर्ड इंडिया लिमिटेड, पुणे 2008, पृ. 237.
6) टॉलस्टाय एक माणूस : सुमती देवस्थळे, राजहंस प्रकाशन, पुणे 2005, पृ. 240, 385.
7) दस्तेयवस्की : अनिरुद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल, पुणे 1985, पृ. 114.
8) Five approaches of Literary criticism, ed.- Wilbur Scott, Collier - Macmillan, Ltd. London, 1967, page 43.
9) मुक्तिबांधांचे साहित्य, मौज, मुंबई, 1986, पृ. 123
10) कमल देसाई यांचे कथाविश्व, मौज, मुंबई, 1984, पृ.24–25
11) उक्त, भा. त. रूपरेशा, पृ. 227
12) धुके आणि शिल्प – त्र्यं. वि. सरदेशमुख, पृ. 82, 83.
13) Daily Maharashtra Herald, Sunday, December - 2- 2007.
14) निवडक समीक्षा – रा. ग. जाधव, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2006, पृ. 378, 380.
15) दै. सकाळ, दि. 5–12–2007 (भाषणांचा वृत्तांत), पृ. 9.
16) दलित साहित्य : एक अभ्यास – संपा. अर्जुन डांगळे, सुगावा प्रकाशन, पुणे, 1998, पृ. 108.
17) बाकी शून्य : कमलेश वालावलकर, राजहंस प्रकाशन, पुणे, 2005, पृ. 152.
18) गुलाम नाही योद्धे पैदा होतायत : सचिन माळी, विद्रोही प्रकाशन, मुंबई, 2007, पृ. 58.